# 19 जानेवारी

**आजचा सुविचार :**

बोलून विचार करण्यापेक्षा बोलण्याआधी विचार केलेला बरा.

**आजचे पंचांग :**

वार – बुधवार
दिनांक : 19 जानेवारी 2022

तिथी – पौष
नक्षत्र – आश्लेषा

सुर्योदय – सकाळी 7.03 वाजता
सूर्यास्त सायंकाळी 6. 23 वाजता

**आजचे दिनविशेष :**

1966 : भारताच्या पंतप्रधानपदी इंदिरा गांधी यांनी पदभार स्वीकारला.

1898 : मराठी लेखक, कादंबरीकार वि. स. खांडेकर यांचा जन्म.

**आजचे इंग्लिश शब्द :**

1) Final – अंतिम 2) Female - महिला 3) Fifty – पन्नास 4) Finger – बोट

**आजची प्रश्नमंजुषा :**

1) प्राण्यांचे आपल्याला कोणते उपयोग आहेत ते सांगा.

2) तुम्हाला माहित असलेल्या रंगांची नावे सांगा.

3) पाणी आणि क्षार शोषून घेणारा वनस्पतीचा अवयव कोणता?

4) 3,567 या संख्येचा स्थानमुल्यानुसार विस्तार सांगा.

**बोधकथा :**

## लाकडाची मोळी

एकदा एका गावात तीन शेतकरी होते. तिघांच्याही शेतातील पिके सुकून गेली होती आणि त्यांना विषाणूंची लागण झाली होती. दररोज ते तिघेही पिक सुधारण्यासाठी नवनवीन उपाय शोधत होते. पहिल्याने बुजगावणं लावून पाहिलं, दुसऱ्याने कीटकनाशके वापरली आणि तिसऱ्याने शेतीभोवती कुंपण घातले.

एक दिवस गावाचे सरपंच आले आणि त्यांनी तिन्ही शेतकऱ्यांना बोलावले. त्यांनी प्रत्येकाला लाकडाची एक काठी दिली आणि ती मोडण्यास सांगितली. शेतकरी ती सहज मोडू शकले. मग त्यांनी प्रत्येक शेतकऱ्याला तीन लाकडांची मोळी दिली आणि तोडण्यास सांगितले. यावेळी त्यांना खूप संघर्ष करावा लागला.

सरपंच म्हणाले, “ एकट्याने काम करण्यापेक्षा एकत्र केले तर आपण जास्त ताकतवान असतो.” शेतकऱ्यांनी त्यांची साधने एकत्र केली आणि कीटकांपासून सुटका करून घेतली.

**तात्पर्य – एकी हेच बळ**